**ठळक बातम्या**

- महाराष्ट्रात सरासरीच्या तुलनेत ११७ टक्के पाऊस, दिवाळीपूर्वी मदत देण्याचं सरकारचं आश्वासन

- भारत आणि भूतान रेल्वेमार्गानं जोडले जाणार

- लॉरेन्स बिश्नोई टोळी कॅनडात दहशतवादी संघटना म्हणून जाहीर

**आणि**

- महिला विश्वचषक क्रिकेट स्पर्धा उद्यापासून भारतात सुरू होणार, भारत आणि श्रीलंका यांच्यात पहिला सामना

**<><><><><>**

राज्यात सरासरीच्या तुलनेत ११७ टक्के पाऊस झाला आहे. कोल्हापुरातला ८५ टक्के आणि अमरावती, रायगड तसंच नाशिकमधला सुमारे ९५ टक्के वगळता इतर सर्व जिल्ह्यात सरासरीपेक्षा अधिक पावसाची नोंद झाली आहे. सर्वाधिक १७० टक्क्यांहून अधिक पाऊस सांगलीत झाला. जळगावमध्ये सरासरीच्या १४१ टक्के पावसाची नोंद झाली आहे.

अतिवृष्टीमुळं राज्यातले ४१ हजारांपेक्षा अधिक नागरिक स्थलांतरित झाले आहेत, अशी माहिती राज्य सरकारनं दिली आहे. सर्वाधिक १३ हजारांहून अधिक नागरिक सोलापूरात स्थलांतरित झाले आहेत. तर जालन्यात साडे ८ हजार, छत्रपती संभाजीनगरमध्ये ८ हजारांहून अधिक आणि धाराशिवमध्ये सुमारे ४ हजार नागरिक स्थलांतरित झाले आहेत.

राज्यात अतिवृष्टीमुळं झालेल्या नुकसानीचे पंचनामे या आठवडाअखेर पूर्ण होतील. दिवाळीपूर्वी सरकार शेतकऱ्यांना मदत करेल असं आश्वासन महसूलमंत्री

चंद्रशेखर बावनकुळे यांनी दिलं. अतिवृष्टीमुुळे राज्यात झालेलं नुकसान ही गेल्या ५० वर्षातील सर्वात मोठी आपत्ती असल्याचं ते म्हणाले….

**होल्ड बाईट बावनकुळे**

पंचनामे काटेकोरपणे व्हावेत यासाठी महसूल विभागाला आदेश देण्यात आले आहेत. ई - पंचनामे केले जात आहेत. प्रत्येक पंचनामा ग्रामसभेत दाखवणं अनिवार्य केलं असून, अधिकारी थेट शेतात जाऊन प्रत्यक्ष पाहणी करत आहेत, असं बावनकुळे यांनी सांगितलं.

**<><><><><>**

राज्यात होत असलेली अतिवृष्टी आणि पूरपरिस्थितीमुळे इयत्ता बारावीच्या विद्यार्थ्यांना परिक्षा अर्ज भरण्यासाठी येत्या २० ऑक्टोबरपर्यंत मुदतवाढ देण्याचा निर्णय राज्य परीक्षा मंडळानं घेतला आहे. ही मुदत उद्यापर्यंत होती.

**<><><><><>**

राष्ट्रीय लोकशाही आघाडी सरकारनं देशाला सुशासनाचं नवं मॉडेल दिलं असून, विकास आणि वारशाचा मंत्र घेऊन हे सरकार पुढं जात आहे, असं प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी म्हटलं आहे. ते आज दिल्लीत दिनदयाळ उपाध्याय मार्गावर नव्यानं बांधलेल्या प्रदेश भाजपा कार्यालयाचं उद्घाटन करताना बोलत होते. देशाच्या सुरक्षेला सरकारनं सर्वोच्च प्राधान्य दिलं असून, देश भ्रष्टाचारमुक्त करण्याच्या निर्णायक लढ्याबाबत लोकांमधे विश्वास निर्माण केला आहे, असं ते म्हणाले.

**<><><><><>**

युरोपीय मुक्त व्यापार संघटनेबरोबरचा मुक्त व्यापार करार येत्या १ ऑक्टोबरपासून लागू होईल, अशी माहिती केंद्रीय वाणिज्य आणि उद्योगमंत्री पियूष गोयल यांनी आज दिली. आईसलँड, लिक्टेस्टाईन, नॉर्वे आणि स्वित्झर्लंड हे देश या संघटनेचे सदस्य आहेत. भारताशी मुक्त व्यापार करार करण्यासाठी विकसित

देश उत्सुक असून संयुक्त अरब अमिराती, ऑस्ट्रेलिया आणि ब्रिटनशी असे करार पूर्ण झाल्याचंही गोयल यांनी सांगितलं. ग्रेटर नॉयडा इथं उत्तर प्रदेश आंतरराष्ट्रीय व्यापार कार्यक्रमाच्या समारोप सत्रात ते बोलत होते. मुक्त व्यापार कराराबाबत अमेरिका, युरोपीय संघ, न्यूझीलंड, ओमान, पेरू आणि चिले यांच्याशी चर्चा सुरू असून कतार आणि बहारीन या देशांनीही रस दाखवल्याचंही त्यांनी नमूद केलं.

<><><><><>

देशाच्या औद्योगिक उत्पादन निर्देशांकात ऑगस्ट महिन्यात ४ टक्के वाढ झाली. जुलै मध्ये हा निर्देशांक केवळ अर्धा टक्के होता. ऑगस्टमध्ये कारखान्यांमधलं उत्पादन ४ टक्क्यानं वाढल्याचं केंद्रीय सांख्यिकी आणि अंमलबजावणी मंत्रालयानं म्हटलं आहे.

<><><><><>

देशाच्या सागरी सुरक्षेत कृत्रिम बुद्धिमत्ता, ड्रोन आणि स्वयंचलित प्रतिसाद यंत्रणांचा समावेश करण्याचं प्रतिपादन संरक्षण मंत्री राजनाथ सिंह यांनी केलं आहे. ते आज नवी दिल्लीत झालेल्या बेचाळिसाव्या भारतीय तटरक्षक दल कमांडर्स परिषदेच्या उद्घाटन प्रसंगी बोलत होते. सायबर आणि इलेक्ट्रॉनिक प्रकारच्या युद्धासारख्या धोक्यांपासून बचाव करण्यासाठी तटरक्षक दलानं अनुकूलन साधण्याची गरज यावेळी राजनाथ सिंह यांनी व्यक्त केलं.

उद्यापर्यंत चालणाऱ्या या तीन दिवसांच्या परिषदेत सागरी सुरक्षेसमोरच्या आव्हांनाचा आणि हिंद महासागर प्रदेशातल्या वाढत्या धोरणात्मक महत्त्वाचा आढावा घेण्यात येत आहे.

<><><><><>

सेवा पर्व या विशेष मालिकेत आज ऐकूया समुद्रयान या भारताच्या पहिल्या मानवसहित खोल सागरी मोहिमेमुळे या क्षेत्रात देशाचं नाव कसं आघाडीवर येत आहे, त्याबद्दल…

## *होल्ड... कॅप्सूल*

*(भारतानं २०११ मध्ये खोल समुद्रातल्या संशोधनासाठी समुद्रयान मोहिम सुरू केली होती. या मोहिमेचा उद्देश सागरी संसाधनं आणि नील अर्थव्यवस्था बळकट करणं हा आहे. भारतानं फ्रान्सच्या सहकार्यानं विकसित केलेल्या मत्स्य ६००० या पाणबुडीत तीन जलवीरांना सहा हजार मीटर इतक्या खोल समुद्रात घेऊन जायची क्षमता आहे. या मोहिमेत कमांडर जतिंदर पाल सिंह आणि राजू रमेश यांनी पाच हजार मीटरपर्यंत जाऊन इतिहास रचला आहे.*

*यंदाच्या स्वातंत्र्यदिनाच्या भाषणात प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी समुद्रात तेल आणि वायूसाठ्यांचा शोध घेण्यासाठीच्या राष्ट्रीय खोल सागरी शोधमोहिमेची घोषणा केली होती. या मोहिमेचं नाव समुद्र मंथन असं आहे आणि ऊर्जा क्षेत्रात आत्मनिर्भर होण्याच्या दिशेनं हे एक महत्त्वाचं पाऊल आहे.*

***होल्ड... बाईट- प्रधानमंत्री नरेंद्र मोदी***

*खोल समुद्रातल्या संशोधनामुळं भारताला विविध खनिजं, जैव विविधता, ऊर्जा यासारख्या क्षेत्रातल्या संधींचा लाभ घेता येईल आणि खोल समुद्रात संशोधन करणाऱ्या काही मोजक्या देशांच्या पंक्तीत जाण्याची संधी मिळेल.)*

**<><><><>**

भारत आणि भूतान या दोन देशांनी कोकराझार ते गेलेफू आणि बानरहाट ते सामत्से यादरम्यान सीमापार दोन रेल्वे प्रकल्प उभारायला संमती दिली आहे. रेल्वेमंत्री अश्विनी वैष्णव यांनी आज वार्ताहर परिषदेत ही माहिती दिली. सुमारे ९० किलोमीटरचा हा रेल्वेमार्ग ४ हजार ३३ कोटी रुपये खर्चून बांधला जाणार आहे. भूतानच्या अर्थव्यवस्थेच्या विकासात सुलभ रेल्वे जोडणी महत्त्वाची भूमिका बजावेल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. परराष्ट्र सचिव विक्रम मिस्त्रीही यावेळी उपस्थित होते. भारत आणि भूतान यांच्यातले संबंध विश्वास, परस्पर आदर आणि सामंजस्यावर आधारलेले असल्याचं मिस्त्री यांनी सांगितलं.

**<><><><>**

लॉरेन्स बिश्नोई टोळीला कॅनडानं दहशतवादी संघटना म्हणून जाहीर केलं आहे. कॅनडाचे नागरी सुरक्षा मंत्री गॅरी आनंदसँग्री यांनी आज ही घोषणा केली. या टोळीचे सदस्य खून, गोळीबार, जाळपोळ आणि खंडणी अशा गुन्ह्यांमध्ये सामील

असल्याचं कॅनडा सरकारच्या अधिकृत संकेतस्थळावर म्हटलं आहे. यामुळं बिश्नोई टोळीची कॅनडातली सगळी मालमत्ता, वाहनं, पैसा गोठवण्याचा, जप्त करण्याचा, तसंच त्यांच्याविरोधात दहशतवादी कृत्यांसाठी गुन्हे दाखल करण्याचा अधिकार कॅनडा सरकारला मिळेल.

<><><><><>

नेपाळनं माजी प्रधानमंत्री के पी शर्मा ओली यांना प्रवासावर निर्बंध लादले आहेत. नेपाळमधे अलिकडेच झालेल्या हिंसक आंदोलनाच्या चौकशीचा भाग म्हणून हे निर्बंध घातले असल्याचं नेपाळचे गृहमंत्री प्रकाश अर्याल यांनी आज सांगितलं. माजी गृहमंत्री रमेश लेखक, राष्ट्रीय अन्वेषण विभागाचे माजी प्रमुख हुताराज थापा आणि दोन ज्येष्ठ नोकरशाहांनाही प्रवास करायला निर्बंध घातले असल्याचं त्यांनी सांगितलं.

नेपाळमधल्या आंदोलनात ७३ जणांचा मृत्यू झाला होता. या हिंसाचाराची चौकशी करण्यासाठी हंगामी प्रधानमंत्री सुशीला कार्की यांनी एक आयोगही स्थापन केला आहे. या आयोगानं काल हे निर्बंध लादल्याची शिफारस केली.

<><><><><>

पाकव्याप्त काश्मीरमध्ये पाकिस्तान सरकारविरोधात झालेल्या निदर्शनांमध्ये पोलिसांनी गोळीबार केल्यानं २ जण ठार तर २२ जण जखमी झाले. पाकिस्तान तहरीक ए इन्साफ संघटनेनं या निदर्शनांना समर्थन करत सरकारवर अक्षम असल्याचा आणि दडपशाहीचा आरोप केला आहे. या निदर्शनांनंतर पाकव्याप्त काश्मीरमधली मोबाईल आणि इंटरनेट सेवा बंद करण्यात आली आहे.

<><><><><>

महिला विश्वचषक क्रिकेट स्पर्धा उद्यापासून सुरु होणार आहे. उद्घाटनाचा सामना गुवाहाटी इथं भारत आणि श्रीलंका यांच्यात होणार आहे. भारत या स्पर्धेचं आयोजन करत आहे. अधिक जाणून घेऊया आमच्या प्रतिनिधीकडून

## व्हाइस कास्ट

*(२ नोव्हेंबरपर्यंत चालणाऱ्या या स्पर्धेत आठ संघांमध्ये ३१ सामने होतील. गुवाहाटी, इंदूर, विशाखापट्टणम आणि नवी मुंबई इथं हे सामने होणार आहेत. मात्र पाकिस्तानचे सर्व सामने श्रीलंकेत कोलंबो इथं होतील. भारत आणि पाकिस्तान यांच्यातला सामना ५ ऑक्टोबरला कोलंबोमध्ये होईल. २९ आणि ३० ऑक्टोबरला उपांत्य सामने होतील. अंतिम सामना २ नोव्हेंबरला नवी मुंबईत डीवाय पाटील स्टेडियमवर होईल. मात्र पाकिस्तानचा संघ अंतिम फेरीत पोहोचला तर हा सामना कोलंबोमधे होईल.*

*२६ ऑक्टोबरला रोजी इंग्लंड आणि न्यूझीलंड यांच्यातला सामना सकाळी ११ वाजता सुरू होईल. इतर सर्व सामने दुपारी ३ वाजता सुरू होणार आहेत.*

*आंतरराष्ट्रीय क्रिकेट परिषदेनं महिला एकदिवसीय विश्वचषकासाठी बक्षीसाची रक्कम सुमारे १२२ कोटी रुपये, म्हणजे गेल्या वेळच्या तुलनेत चौपट केली आहे. ही रक्कम पुरुष विश्वचषकापेक्षा ३९ कोटी रुपयांनी जास्त आहे.)*

**//<><><><><>//**